# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१२/०८/२०२२

<u>**प्रेसनोट**</u>

**'घरोघरी तिरंगा' उपक्रमाच्या जनजागृतीसाठी महानगरपालिकेमार्फत बाईक रॅलीचा कार्यक्रम संपन्न**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित 'घरोघरी तिरंगा' उपक्रम वसई विरार महानगरपालिकेत राबविण्यात येत आहे. 'घरोघरी तिरंगा' या उपक्रमाच्या जनजागृतीसाठी आज दि.१२ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका अग्निशमन विभागातर्फे बाईक रॅली काढण्यात आली. मा.आमदार श्री.क्षितीज ठाकूर व मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांनी फ्लॅग ऑफ करून बाईक रॅलीस सुरुवात झाली. नवीन विवा कॉलेज विरार पश्चिम येथून बाईक रॅलीस सुरु होऊन वसई कोर्ट (वसई पश्चिम) येथे बाईक रॅली संपन्न झाली. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी यावेळी विविध घोषणा देऊन 'घरोघरी तिरंगा' उपक्रमात नागरिकांनी मोठा सहभाग नोंदवावा याविषयी जनजागृती केली.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**